भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०११-१२/८**

**महापरिपत्रक क्र.०८/२०११-१२** **जुलै ०१, २०११**

प्रति,

वर्ग - १ प्राधिकृत डीलर बँक आणि प्राधिकृत बँक

महोदय/महोदया,

**फेमा, १९९९ खाली केलेल्या उल्लंघनांचे परिणामगणन (कंपाउंडिंग) ह्यावरील महापरिपत्रक**

विदेशी मुद्रा यवस्थापन अधिनियम (फेमा), १९९९ खाली केलेल्या उल्लंघनांचे परिणामगणन (कंपाउंडिंग) करणे ही एक ऐच्छिक प्रक्रिया असून तिच्याद्वारे अर्जदार, फेमा १९९९ च्या कलम १३ (१) खाली, फेमा १९९९ च्या कोणत्याही कबूल केलेल्या उल्लंघनांचे कंपाउंडिंग करु शकतो.

२. ह्या महापरिपत्रक '**फेमा, १९९९खाली केलेल्या उल्लंघनांचे कंपाउंडिंग**' ह्या विषयावरील सर्व विद्यमान सूचना एकाच जागी एकत्रित करण्यात आल्या आहेत. ह्या महापरिपत्रकात एकत्रित केलेली परिपत्रके/अधिसूचना परिशिष्ट दिल्या आहेत.

३. हे महापरिपत्रक एक वर्षाच्या सनसेट क्लॉजसह देण्यात आले आहे. हे परिपत्रक जुलै १, २०१२ रोजी काढून घेतले जाईल आणि त्याच्या जागी ह्या विषयावरील अद्यावत केलेले महापरिपत्रक येईल.

आपला,

**(डॉ सुजाथा एलिजाबेथ प्रसाद)**
**प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक**

**अनुक्रमणिका**


१ सर्वसाधारण........................................................................................३

२. कंपाउंडिंगचे अधिकार..........................................................................३

३. कंपाउंडिंगची प्रक्रिया..........................................................................३

४. कंपाउंडिंगची व्याप्ती व रीत....................................................................५

५. कंपाउंडिंग ऑर्डर देणे..........................................................................५

६. कंपाउंडिंग नंतरची कार्यकृती....................................................................६

७. कंपाउंडिंग प्रक्रियेसाठी पूर्व-आवश्यकता.......................................................६

जोडपत्र.................................................................................................७

विदेशी मुद्रा (कंपाउंडिंग रुल्स),२०००,..........................................................७

अर्जाचा नमुना.......................................................................................११

परिशिष्ट...............................................................................................१५

नियम/ए.पी. (डीआयआर मालिका)ची परिपत्रकात एकत्रित केलेली यादी...............................१५

## १ सर्वसाधारण

१.१ फेमा १९९९ खाली दिलेल्या अधिकारांचा वापर करुन दिलेली त्याची तरतुद किंवा नियम किंवा विनियम किंवा आदेश ह्यांचे किंवा ज्याबाबत रिझर्व बँकेने प्राधिकरण दिलेल्या एखादी अट ह्यांचे एखाद्या व्यक्तीने उल्लंघन केल्यास, त्या व्यक्तीला, तसा निर्णय दिला गेल्यावर, अशी उल्लंघनासंबंधीची रक्कम रु दोन लाखापर्यंत असल्यास तिच्या तीन पट रक्कम दंड म्हणून भरावी लागेल. व जेथे अशी रक्कम ठरविण्यास कठीण असल्यास व सातत्याने उल्लंघन केले जात असल्यास, उल्लंघनाच्या प्रथम दिवसापासून प्रत्येक दिवसासाठी रु पाच हजाराचा दंड भरावा लागेल (कलम १३(१) फेमा १९९९चे प्रकरण ४) फॉरिन एक्सचेंज (कंपाउंडिंग प्रोसिडिंग्ज) रुल्स, २०००च्या नियम ४ अनुसार, कंपाउंडिंग प्राधिकरणांना, अशा उल्लंघनांचे कंपाउंडिंग करण्याबाबतचे अधिकार, उल्लघनांमधील रकमांच्या संबंधाने विहित करण्यात आले आहेत. आणि अशा उल्लंघनामधील रक्कम निश्चित नसल्यास कोणत्याही उल्लंघनाचे कंपाउंडिंग केले जाणार नाही.

१.२ भारत सरकारने, विदेशी मुद्रा (कंपाउंडिंग प्रोसिडिंग्ज) नियम, २००० तयार व प्रसिध्द केले असून, फेमा १९९९ खाली उल्लंघनांचे कंपाउंडिंग करण्याचे अधिकार रिझर्व बँकेला दिले आहेत. फेमा १९९९ च्या कलम १५ने उल्लंघनांचे कंपाउंडिंग करण्यास परवानगी दिली असून, असे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीने, निर्णय देणाऱ्या संस्थेने निर्णय देण्यापूर्वी किंवा नंतर अर्ज केल्यास, ह्या अधिनियमाच्या कलम १३ खाली व्याख्या कोणत्याही उल्लंघनांचे कंपाउंडिंग करण्याचे अधिकार कंपाउंडिंग प्राधिकरणाला देण्यात आले आहेत.

१.३ फेमा १९९९ च्या कलम ३(अ) खाली उल्लंघने सोडून, भारत सरकारने रिझर्व बँकेचा सल्ला घेऊन, उल्लंघनांचे कंपाउंडिंग करण्याची जबाबदारी रिझर्व बँकेवरच सोपविली आहे. त्यानुसार, फेमा १९९९ खाली केलेल्या उल्लंघनांचे कंपाउंडिंग करण्याची कार्यरीत, व्यवहारांचे खर्च कमीत कमी करुन परंतु हेतुतः व वाईट उद्देशाने व लबाडीने केलेल्या व्यवहारांचा गंभीर विचार करुन, नागरिक व कॉर्पोरेट समाजाच्या सोयीसाठी तयार करण्यात आली आहे.

## २. कंपाउंडिंगचे अधिकार

२.१ रिझर्व बँक अंमलबजावणी संचालनालय (डीओई) ह्यांचे अनुक्रमे अधिकार पुढीलप्रमाणे आहेतः

(अ) ह्या अधिनियमाच्या कलम ३ चा खंड (अ) सोडून, फेमा १९९९च्या सर्व उल्लंघनांचे कंपाउंडिंगचे अधिकार रिझर्व बँकेला देण्यात आले आहेत.

(ब) अंमलबजावणी संचालनालय, फेमा १९९९ च्या कलम ३ च्या खंड (अ) ने दिलेल्या (मुख्यतः हवाला व्यवहाराबाबत) कंपाउंडिंग अधिकारांचा वापर करील.

२.२ फेमा १९९९ खाली परिणामकारक अशा कंपाउंडिंग प्रक्रियेची अंमलबजावणी करण्यासाठी, रिझर्व बँकेने उल्लंघनांचे कंपाउंडिंग करण्यासाठी कार्यरीती तयार केल्या आहेत. कंपाउंडिंग प्राधिकरणाने एकदा एखाद्या उल्लंघनांचे कंपाउंडिंग केल्यावर त्या उल्लंघनकाराविरुध्द, जसे असेल त्यानुसार पुढील किंवा कोणतीही कार्यवाही करता येणार नाही.

## ३. कंपाउंडिंगची प्रक्रिया

३.१ फेमा १९९९ खाली केलेल्या उल्लंघनाचे कंपाउंडिंग करण्याबाबतचा अर्ज, त्या उल्लंघनाची जाणीव झाल्यावर किंवा

ते केले गेल्यानंतर लगेच, एखाद्या टाचणाद्वारे फेमा १९९९ चे उल्लंघन झाल्याचे कळविले गेल्यास, कंपाउंडिंग ऑथोरिटीकडे (सीए) केला जावा. ह्या अर्जाचा नमुना, फॉरिन एक्सचेंज (कंपाउंडिंग प्रोसिडिंग्ज) नियम २००० (ॲनेक्स) च्या जोडपत्रात दिला आहे.

३.२ कोणत्याही उल्लंघनाचे कंपाउंडिंग करण्यासाठीचा विहित नमुन्यामधील अर्ज, लागु असेल तेथे टाचणाच्या प्रतीसह व मुंबई येथे देय असलेला व 'रिझर्व बँक ऑफ इंडिया' च्या नावे काढलेला रु ५०००/- डिमांड ड्राफ्ट सोबत जोडून तो संबंधित कागदपत्र व सत्य घटना कळवून, कंपाउंडिंग ऑथोरिटी, (सेल फॉर इफेक्टिव इंप्लिमेंटेशन ऑफ फेमा १९९९ (सेफा)), विदेशी मुद्रा विभाग, ५ वा मजला, अमर बिल्डिंग, सर पी.एम. रोड, फोर्ट, मुंबई-४००००१ ह्यांचेकडे सादर केला जावाः

३.३ कंपाउंडिंगसाठी आलेला अर्ज मिळाल्यावर तो संपूर्ण अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून १८० दिवसांच्या आत त्यावरील कारवाई पूर्ण केली जाऊन सीएद्वारा आदेश दिला जाईल. ह्यासाठी असणारा कालावधी, संपूर्ण असलेला कंपाउंडिंगसाठीचा अर्ज रिझर्व बँकेला मिळाल्याच्या तारखेपासून मोजला जाईल. सीएद्वारा, कंपाउंडिंगच्या कारवाईबाबत, कोणतीही माहिती, रेकॉर्ड किंवा इतर कागदपत्र मागविले जाऊ शकतात व त्यानंतर कार्यवाही केली जाते. उल्लंघनकर्ता व इतर संबंधितांना सुनावणीची एक संधी दिल्यानंतर सीएद्वारा कंपाउंडिंगचा आदेश पारित केला जाईल.

३.४ विदेशी मुद्रा (कंपाउंडिंग कार्यवाही) नियम २०००च्या नियम (४) च्या उपनियम (१) च्या अटींनुसार, तो अर्ज, जोडलेली कागदपत्रे व त्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारावर तपासला जाईल. व ते उल्लंघन कंपाउंडिंग करण्यासारखे आहे काय ह्याचे मूल्यांकन केले जाऊन, तसे असल्यास त्यानुसार त्या उल्लंघनाची रक्कम ठरविली जाईल.

३.५ इतर बाबींबरोबर पुढील निदर्शक मुद्दे लक्षात घेऊन त्या उल्लंघनाचे स्वरुप ठरविले जाईलः

अ. ते उल्लंघन तांत्रिक आणि/किंवा लहान स्वरुपाचे आहे काय व त्यासाठी केवळ सावधानतेचा इशारा देण्याची गरज आहे काय;

ब. ते उल्लंघन गंभीर स्वरुपाचे आहे काय व त्यासाठी त्याचे कंपाउंडिंग करावयाची आवश्यकता आहे काय; आणि

क. प्रथम दर्शनीच त्या उल्लंघनामध्ये मनी - लॉंडरिंग, व विनियामक साचाचा गंभीर भंग झाला असल्याने सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

तथापि, उल्लंघनांचे वरीलप्रमाणे वर्गीकरण करण्याचा अधिकार राखून ठेवत आहे आणि उल्लंघनकर्ता किंवा इतरांना कोणतेही उल्लंघन तांत्रिक म्हणून वर्गीकृत करण्याचा कोणताही अधिकार नाही.

३.६ कंपाउंडिंगबाबतच्या अर्जाची वासलात एक कंपाउंडिंग आदेश केली जाते व त्यात, ते उल्लंघन ज्याच्या अन्वये झाले आहे, त्या फेमा १९९९ च्या च्या तरतुदी नियम, विनियम, अधिसूचना, निदेश किंवा फेमा १९९९ खाली मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन दिलेला आदेश स्पष्टपणे दिला जातो.

३.७ कंपाउंडिंग कार्यवाहीशी संबंधित अशी माहिती, रेकॉर्ड किंवा इतर कोणतेही कागदपत्र सीए मागवू शकतो अशी अतिरिक्त माहिती/कागदपत्र, सीएने विहित केलेल्या कालावधीत सादर करणे आवश्यक आहे आणि अशा विहित

कालावधीत ती माहिती/कागदपत्र सादर न केल्यास तो अर्ज फेटाळला जाऊ शकतो.

३.८ पुढील चौकशी करण्यासाठी पुरेशी कारण असलेल्या बाबतीत, रिझर्व बँक, तिला योग्य वाटेल तसे ते प्रकरण फेमा १९९९ खाली पुढील चौकशी व कारवाईसाठी अंमलबजावणी संचालनालयाकडे किंवा प्रिव्हेंशन ऑफ मनी लाँडरिंग अधिनियम (पीएमएलए) २००२ खाली स्थापन झालेल्या ॲटी-मनी लाँडरिंग प्राधिकरणाकडे किंवा अन्य एजन्सींकडे पाठवू शकते. अशा अर्जांची वासलात, ते अर्ज अर्जदाराकडे परत पाठवून केली जाते.

## ४. कंपाउंडिंगची व्याप्ती व रीत

४.१ फेमा १९९९ ची कोणतीही तरतुद किंवा फेमा १९९९ खाली मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन दिलेला नियम, विनियम, अधिसूचना, निदेश किंवा आदेश ह्यांच्याशी संबंधित केल्या गेलेल्या उल्लंघनांसाठी सीए निर्णय देईल.

४.२ त्याबाबतचा अर्ज, सादर केलेली कागदपत्रे व वैय्यक्तिक सुनावणीमध्ये केलेल्या सादरीकरणाच्या आधारावर सीए आपले मत तयार करील.

४.३ कंपाउंडिंगसाठी सादर केलेल्या अर्जाची वासलात गुणवत्तेवर, रेकॉर्ड्स तसेच सादर केलेली कागदपत्रे व सीएच्या मत ह्याच्या विचार करुनच केली जाईल. केवळ निर्देशक असलेले पुढील घटक, कंपाउंडिंग आदेश पारित करण्यासाठी व कंपाउंडिंग केल्या जात असलेल्या उल्लंघनाबाबतची देय रक्कम काढण्यासाठी विचारात घेतले जातीलः

(i) त्या उल्लंघनामुळे, ठरविता येण्यासारख्या अन्यायकारी लाभाचे आकारमान;

(ii) त्या उल्लंघनामुळे, कोणतेही प्राधिकरण/एजन्सी/एक्सचेकरना झालेल्या तोट्याचे आकारमान;

(iii) विलंबाने केलेल्या किंवा टाळलेल्या अनुपालनामुळे उल्लंघनकर्त्याला झालेला लाभ;

(iv) त्या उल्लंघनाचे सततचे स्वरुप, मागील कामगिरी आणि/किंवा त्या उल्लंघनकाराकडून अनुपालन न केले जाणे.

(v) तो व्यवहार करत असतांनाची उल्लंघनकर्त्याची वर्तणुक व अर्जामध्ये दिलेल्या सत्य गोष्टी व वैय्यक्तिक सुनावणीदरम्यान केलेले सादरीकरण; आणि

(vi) योग्य व संबंधित असलेला अन्य घटक

## ५. कंपाउंडिंग ऑर्डर देणे

५.१ केलेल्या अर्जाच्या पुष्टिसासाठी, विहित कालामध्ये, आणखी काही कागदपत्र समक्ष सादर करण्यासाठी, वैय्यक्तिक सुनावणीची संधी अर्जदाराला देण्यात येते. उल्लंघनकर्ता किंवा त्याचा प्रतिनिधी प्रत्यक्ष स्तर न राहिल्यास किंवा त्याने सीएसमोरील वैय्यक्तिक सुनावणीमध्ये काही कागदपत्रे सादर न केल्यास, कंपाउंडिंसाठी केलेली माहिती व त्यासोबतचे कागदपत्र ह्यांच्या आधारावर सीए त्या अर्जावरील प्रक्रिया सुरु करील.

५.२ अर्जामध्ये केलेल्या प्रतिकूल बाबी व ह्या संदर्भात त्या उल्लंघनकर्त्याने त्यासोबत व प्रत्यक्ष सुनावणीमध्ये सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारावर कंपाउंडिंग प्राधिकरण कंपाउंडिंग आदेश पारित करील.

५.३ फेमा १९९९ च्या कलम १६ च्या उपकलम (३) खाली तक्रार केल्यानंतर, एखाद्या उल्लंघनाचे कंपाउंडिंग केले गेल्यास, विदेशी मुद्रा (कंपाउंडिंग कार्यवाही) नियम, २००० च्या नियम ८ च्या उपनियम (२) खाली दिल्या गेलेल्या

आदेशाची एक प्रत, अर्जदाराला (उल्लंघनकर्ता) व निर्णय घेणाऱ्या प्राधिकरणाला दिली जाईल.

**६. कंपाउंडिंग नंतरची कार्यकृती**

६.१ विदेशी मुद्रा (कंपाउंडिंग कार्यवाही) नियम, २००० च्या नियम ८ च्या उपनियम (२) खाली दिल्या गेलेल्या आदेशामधील कंपाउंडिंगसाठी दाखविलेली रक्कम ही, उल्लंघन केल्याबाबतच्या आदेशाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत 'रिझर्व बँक ऑफ इंडिया' च्या नावे काढलेल्या डिमांड ड्राफ्ट ने द्यावयाची आहे. तो डिमांड ड्राफ्ट, त्या कंपाउंडिंगच्या आदेशात दिल्यानुसार जमा केला जावा.

६.२ कंपाउंडिंगचा आदेश एकदा पारित झाल्यावर ह्या नियमातील तरतुदी, तो आदेश काढून घेणे किंवा तो आदेश रद्दबातल ठरविणे किंवा सीएने पारित केलेल्या आदेशाचे पुनरावलोकन करणे ह्याबाबत, त्या उल्लंघनकर्त्याला कोणताही हक्क देत नाहीत.

६.३ कंपाउंडिंगच्या आदेशात विहित केलेल्या कालावधीत कंपाउंडिंग केलेली रक्कम भरली न गेल्यास, विदेशी मुद्रा (कंपाउंडिंग कार्यवाही) नियम, २००० च्या नियम १० खाली, त्या उल्लंघनकर्त्याने, ह्या नियमांखाली केलेल्या कोणत्याही उल्लंघनाच्या कंपाउंडिंगसाठी अर्जच केला नसल्याचे समजले जाईल.

६.४ उल्लंघनाच्या कंपाउंडिंगच्या डिमांड ड्राफ्टची रक्कम मिळाल्यावर, त्या आदेशात विहित केलेल्या अटींना धरुन, रिझर्व बँकेद्वारा ह्याबाबतचे प्रमाणपत्र दिले जाईल.

६.५ कंपाउंडिंग प्राधिकरणाद्वारे कंपाउंडिंग न केल्या गेलेल्या, फेमा १९९९च्या (फेमा १९९९च्या कलम १३ मध्ये व्याख्या केलेल्या) उल्लंघनांसाठी फेमा १९९९च्या इतर संबंधित तरतुदी लागु होतील.

**७. कंपाउंडिंग प्रक्रियेसाठी पूर्व-आवश्यकता**

७.१ एखाद्या व्यक्तीने केलेल्या उल्लंघनाचे कंपाउंडिंग केले गेले असल्याच्या तारखेपासून तीन वर्षांच्या आत त्याच व्यक्तीने तशाच प्रकारचे उल्लंघन केलेले असल्यास त्या उल्लंघनचे कंपाउंडिंग केले जाणार नाही. अशा उल्लंघनावर, फेमा १९९९च्या संबंधित तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल. आधी केलेल्या उल्लंघनाच्या केलेल्या कंपाउंडिंगच्या तारखेपासून तीन वर्षांनंतर केलेले दुसरे किंवा नंतरचे उल्लंघन हे पहिलेच उल्लंघन असल्याचे समजण्यात येईल.

७.२ सरकार किंवा संबंधित वैधानिक प्राधिकरणांकडून योग्य ती मंजुरी किंवा परवानगी न घेता केलेल्या व्यवहारांबाबतच्या उल्लंघनांचे कंपाउंडिंग, संबंधित प्राधिकरणाकडून आवश्यक ती मंजुरी मिळविल्याखेरीज केले जाणार नाही.

७.३ मनी लॉंडरिंग, राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न, आणि/किंवा विनियामक साचाचे गंभीर उल्लंघन अशी उल्लंघनाची प्रकरणे किंवा कंपाउंडिंग आदेशातील अटी व शर्तीनुसार, कंपाउंडिंग केलेल्या उल्लंघनाबाबतची रक्कम, उल्लंघनकर्त्याने विहित काळात भरली नाही अशी प्रकरणे फेमा १९९९ खाली पुढील चौकशी व कारवाईसाठी अंमलबजावणी संचालनालयाकडे किंवा प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉंडरिंग अधिनियम, २००२ (पीएमएलए) ची अंमलबजावणी करण्यासाठी ठेवलेल्या प्राधिकरणाकडे किंवा अन्य एजन्सीकडे आवश्यक त्या कारवाईसाठी पाठविली जातील.

७.४ अशी उल्लंघने नजरेस आल्यावर, रिझर्व बँक, कंपाउंडिंग करण्याचा अर्ज करण्याचा सल्लासंबंधित व्यक्तींना देत असते रिझर्व बँकेने विहित केलेल्या काळात तसा अर्ज न केला गेल्यास, अशा उल्लंघनांबाबतची खरी माहिती अंमलबजावणी संचालनालयाच्या नजरेस आणली जाते

**जोडपत्र**

## विदेशी मुद्रा (कंपाउंडिंग कार्यवाही) रुल्स, २०००

अधिसूचना क्र. जी.एस.आर.३८३ (ई) दिनांक ३ मे २०००

***बदला अन्वये***

*जी.एस.आर.४४३(ई) नोव्हेंबर २, २००२*

*जी.एस.आर.६०९ सप्टेंबर १३, २००४ आणि जी.एस.आर.६१३*

*(ई) दिनांक ऑगस्ट २७, २००८*

विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ (१९९९ चा ४२) च्या कलम १५ च्या उपकलम (१) सह वाचित, कलम ४६ ने दिलेल्या अधिकारांचा वापर करुन, केंद्र सरकार, ह्या अधिनियमाच्या प्रकरण ४ खाली, उल्लंघनांचे कंपाउंडिंग करण्यासाठी पुढील नियम तयार करत आहेः-

**१. लघु शीर्षक व सुरुवात**

(१) ह्या नियमांखाली विदेशी मुद्रा (कंपाउंडिंग कार्यवाही) नियम, २००० असे संबोधिले जावे.

(२) हे नियम १ जून २००० पासून जारी होतील.

**२. व्याख्या**-ह्या नियमांमध्ये अन्य संदर्भ नसल्यास-

(अ) "अधिनियम' म्हणजे विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियन, १९९९ (१९९९ चा ४२);

(ब) "प्राधिकृत अधिकारी' म्हणजे, नियम ३ च्या उपनियम (१) खाली प्राधिकृत केलेला अधिकारी;

(क) 'अर्जदारा' म्हणजे, कंपाउंडिंग प्राधिकरणाकडे, ह्या अधिनियमाच्या कलम १५ (१) खाली अर्ज करणारी व्यक्ती;

(ड)"कंपाउंडिंग आदेश' म्हणजे, ह्या अधिनियमाच्या कलम १५ च्या उपकलम (१) खाली दिलेला आदेश;

(ई) 'फॉर्म' म्हणजे ह्या नियमांसोबत ओसलेला फॉर्म;

(एफ) 'कलम' म्हणजे ह्या अधिनियमाचे कलम;

(जी) ह्या नियमात व्याख्या न केलेल्या परंतु ह्या अधिनियमात व्याख्या केलेल्या, वापरेलेल्या इतर सर्व शब्दांचे व शब्द स्मुच्चयांचे अर्थ, त्यांना ह्या अधिनियमात दिलेल्या व्याखेप्रमाणेच असतील.

**३.** (१) "कंपाउंडिंग प्राधिकरण' म्हणजे, ह्या अधिनियमाच्या कलम १५ च्या उपकलम (१) खाली, केंद्र सरकारने प्राधिकृत व्यक्ती उदा-

(अ) उप संचालक किंवा उप-वैधानिक सल्लागार (डीएलए) च्या खाली हुद्दा नसलेला अंमलबजावणी संचालनालयाचा अधिकारी.

(ब)सहाय्यक महाव्यवस्थापकापेक्षा कमी हुद्दा नसलेला भारतीय रिझर्व बँकेचा अधिकारी.

**४. उल्लंघनाचे कंपाउंडिंग करण्याचा रिझर्व बँकेचा अधिकार-**

[१]*[(१) ह्या अधिनियमाच्या कलम ३ चा खंड (अ) सोडून अधिनियम १९९९ ( १९९९ चा ४२) च्या कोणत्याही तरतुदीचे एखाद्या व्यक्तीने उल्लंघन केल्यास.]*

(अ) अशा उल्लंघनाबाबतची रक्कम रु दहा लाख किंवा त्यापेक्षा कमी असल्यास, भारतीय रिझर्व बँकेच्या सहाय्यक महाव्यवस्थापकाद्वारे;

(ब) अशा उल्लंघनामधील रक्कम रु दहा लाखांपेक्षा अधिक परंतु चाळीस लाखांपेक्षा कमी असल्यास रिझर्व बँकेच्या उप महाव्यवस्थापकाद्वारे;

(क) अशा उल्लंघनामधील रक्कम रु चाळीस लाखांपेक्षा जास्त परंतु शंभर लाखांपेक्षा कमी असल्यास रिझर्व बँकेच्या उप महाव्यवस्थापकाद्वारे;

(ड) अशा उल्लंघनामधील रक्कम रु शंभर लाखांपेक्षा अधिक असल्यास रिझर्व बँकेच्या उप महाव्यवस्थापकाद्वारे;

मात्र ह्याशिवाय अशा उल्लंघनांबाबतची रक्कम काढण्यासारखी असल्याशिवाय कोणत्याही उल्लंघनाचे कंपाउंडिंग केले जाणार नाही.

(२) ह्या नियमांखाली एखाद्या व्यक्तीने केलेल्या उल्लंघनाचे कंपाउंडिंग केल्याच्या तारखेपासून तीन वर्षांच्या आत त्याच व्यक्तीने केलेल्या तशाच प्रकारच्या उल्लंघनासाठी उपकलम (१) मधील कोणतीही तरतुद लागु होणार नाही

**स्पष्टीकरण:** ह्या नियमापुरते पूर्वी एखाद्या उल्लंघनांचे कंपाउंडिंग केल्याच्या तारखेपासून तीन नंतर दुसरे किंवा त्यानंतरचा उल्लंघने केली गेल्यास ते नवीन उल्लंघन समजले जाईल.

(३) भारतीय रिझर्व बँकेच्या नियम ४ च्या उपनियम (१) खाली विहित केलेला प्रत्येक अधिकारी, रिझर्व बँकेच्या गव्हर्नरचे निदेश, नियंत्रण व पर्यवेक्षणानुसार उल्लंघनाचे कंपाउंडिंग करावयाच्या अधिकाराचा वापर करील.

(४) ह्या नियमाखाली, कोणत्याही उल्लंघनाचे कंपाउंडिंग करावयाचा अर्ज, कंपाउंडिंग ऑथोरिटीच्या नावे रु ५०००/- चा डिमांड ड्राफ्ट जोडून फॉर्म मध्ये, भारतीय रिझर्व बँक, मुद्रा नियंत्रण विभाग, केंद्रीय कार्यालय मुंबई ह्यांचे कडे केला जाईल.

**५. उल्लंघनांचे कंपाउंडिंग करण्याचा , अंमलबजावणी संचालनालयाचा अधिकार-**

[२] *[(१) एखाद्या व्यक्तीने विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियमाच्या कलम ३(अ) च्या तरतुदीचे उल्लंघन केल्यास]*

(अ)अशा उल्लंघनाची रक्कम रु पाच लाख किंवा त्यापेक्षा कमी असल्यास अंमलबजावणी संचालनालयाच्या उप संचालकाद्वारे

(ब) अशा उल्लंघनाची रक्कम रु पाच लाखापेक्षा जास्त व रु दहा लाखांपेक्षा कमी असल्यास अंमलबजावणी संचालनालयाच्या अतिरिक्त संचालकाद्वारे

(क) अशा उल्लंघनाची रक्कम रु दहा लाख किंवा अधिक परंतु रु पन्नास लाखांपेक्षा कमी असल्यास अंमलबजावणी

संचालनालयाच्या विशेष संचालकाद्वारे

[१] जीएसआर ६१३(ई) दिनांक ऑगस्ट २७, २००८
[२] जीएसआर ६०९ (क) दिनांक सप्टेंबर १३, २००४

(ड) अशा उल्लंघनाची रक्कम रु पाच लाखापेक्षा जास्त परंतु एक कोटींपेक्षा कमी असल्यास अंमलबजावणी संचालनालयाच्या उप-वैधानिक सल्लागार विशेष संचालकाद्वार

(ई) अशा उल्लंघनाची रक्कम रु पाच लाखापेक्षा जास्त असल्यास, अंमलबजावणी संचालनालयाच्या संचालकांसह, उपवैधानिक सल्लागारद्वारे

मात्र ह्याशिवाय अशा उल्लंघनांबाबतची रक्कम काढण्यासारखी असल्याशिवाय कोणत्याही उल्लंघनाचे कंपाउंडिंग केले जाणार नाही.

(२) ह्या नियमांखाली एखाद्या व्यक्तीने केलेल्या उल्लंघनाचे कंपाउंडिंग केल्याच्या तारखेपासून तीन वर्षांच्या आत त्याच व्यक्तीने केलेल्या तशाच प्रकारच्या उल्लंघनासाठी उपकलम (१) मधील कोणतीही तरतुद लागु होणार नाही

**स्पस्टीकरणः** ह्या नियमापुरते पूर्वी एखाद्या उल्लंघनांचे कंपाउंडिंग केल्याच्या तारखेपासून तीन नंतर दुसरे किंवा त्यानंतरचा उल्लंघने केली गेल्यास ते नवीन उल्लंघन समजले जाईल.

(३) भारतीय रिझर्व बँकेच्या नियम ४ च्या उपनियम (१) खाली विहित केलेला प्रत्येक अधिकारी, रिझर्व बँकेच्या गव्हर्नरचे निदेश, नियंत्रण व पर्यवेक्षणानुसार उल्लंघनाचे कंपाउंडिंग करावयाच्या अधिकाराचा वापर करील.

(४) ह्या नियमाखाली, कोणत्याही उल्लंघनाचे कंपाउंडिंग करावयाचा अर्ज, कंपाउंडिंग ऑथोरिटीच्या नावे रु ५०००/- चा डिमांड ड्राफ्ट जोडून फॉर्म मध्ये, भारतीय रिझर्व बँक, मुद्रा नियंत्रण विभाग, केंद्रीय कार्यालय मुंबई ह्यांचे कडे केला जाईल.

**६.** कोणत्याही उल्लंघनाचे कलम १६ खाली केलेल्या अधिकृत निर्णयापूर्वी कंपाउंडिंग केले गेले असल्यास, तसे कंपाउंडिंग केलेले उल्लंघन करणाऱ्या व्यक्तिविरुध्द असे उल्लंघन केले गेले असण्याबाबत कोणत्याही निर्णय घेतला जाणार नाही.

**७.** कलम १६ च्या उपकलम (३) खाली तक्रार केल्यानंतर एकाद्या उल्लंघनाचे कंपाउंडिंग केले गेले असल्यास, असे कंपाउंडिंग, नियम ४ किंवा नियम ५ मध्ये विहित केलेल्या प्राधिकरणाद्वारे निर्णय देणाऱ्या प्राधिकरणाच्या नजरेस आणले जावे आणि त्या उल्लंघनाचे कंपाउंडिंग केल्याबाबतची नोटिस दिली गेल्यानंतर, त्या उल्लंघनाच्या कंपाउंडिंगशी संबंधित व्यक्तीला मोकळे करण्यात यावे.

**८. कंपाउंडिंग करण्यासाठी कार्यरीत -**

(१) कंपाउंडिंग प्राधिकरण, त्या कंपाउंडिंग कार्यरीतींशी संबंधित अशी, कोणतीही माहिती, रेकॉर्ड व अन्य कागदपत्र मागवू शकते.

(२) कंपाउंडिंग प्राधिकरण, अर्ज केल्याच्या तारखेपासून १८० दिवसांच्या आत, शक्य तेवढ्या लवकर, सर्व संबंधितांना

सुनावणीची एक संधी दिल्यानंतरच कंपाउंडिंगचे आदेश पारित करील.

**९. कंपाउंडिंग केलेल्या रकमेचे प्रदान** -

[३]नियम ८ च्या उपनियम (२) खाली दिलेल्या आदेशात विहित केलेली, उल्लंघनाच्या कंपाउंडिंग संबंधीची रक्कम, अशा उल्लंघनाच्या कंपाउंडिंगच्या आदेशाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत, कंपाउंडिंग प्राधिकरणाच्या नावे असलेल्या डिमांड ड्राफ्टने दिली जाईल.

**१०.** नियम ९ मधील विहित केलेल्या कालावधीत ही रक्कम भरली न गेल्यास त्या व्यक्तीने केलेल्या उल्लंघनाच्या कंपाउंडिंगसाठी ह्या नियमाखाली अर्जच केला नसल्याचे समजले जाईल आणि उल्लंघनाबाबत ह्या अधिनियमातील तरतुदी त्याला लागु होतील.

**११.** ह्या अधिनियमाच्या कलम १७ किंवा कलम १९ खाली अपील दाखल केलेले असल्यास कोणत्याही उल्लंघनाचे कंपाउंडिंग केले जाणार नाही.

**१२. कंपाउंडिंग प्राधिकरणाच्या आदेशातील मजकूर -**

(१) प्रत्येक आदेशात, ते उल्लंघन केल्या - जाण्याबाबत, ह्या अधिनियमातील नियम किंवा रिक्विफिकेशन किंवा आदेश ह्यातील तरतुदी दिलेल्या असतील व त्यासह संबंधित उल्लंघनाचा तपशील दिला जाईल.

(२) अशा प्रत्येक आदेशावर तारीख, कंपाउंडिंग प्राधिकरणाची सही व शिक्का असेल.

**१३. आदेशाची प्रत**- नियम ८(२) खाली दिलेल्या एक प्रत अर्जदार व निर्णयदेणाऱ्या प्राधिकरण ह्यांना दिली जाईल.

---

[३] जीएसआर ४४३(ई) दिनांक नोव्हेंबर२, २००२

अर्जाचा नमुना

फॉर्म (नियम ४ किंवा ५ पहा)

(दोन प्रतींमध्ये भरावा व त्यासोबत दिल्या गेलेल्या मेमोरँडमची प्रत जोडावी)

१. अर्जदाराचे नाव (ब्लॉक लेटर्समध्ये)

२. अर्जदाराचा पूर्ण पत्ता (फोन नं, फॅक्स नं, ईमेल पत्त्यासह)

३. अर्जदार भारताचा रहिवासी किंवा भारताबाहेर रहिवासी आहे काय [कृपया ह्या अधिनियमाच्या कलम २(५) चा संदर्भ घ्यावा.]

४. प्रकरण प्रलंबित असलेल्या निर्णय-प्राधिकरणाचे नाव

५. उल्लंघनाचे स्वरुप [ कलम १३ च्या उपकलम (१) अनुसार]

६. ह्या प्रकरणाची थोडक्यात माहिती

७. कंपाउंडिंगच्या अर्जाबाबतच्या शुल्काचा तपशील

८. ह्या प्रकरणाशी संबंधित इतर माहिती

मी/आम्ही घोषित करतो की आमच्या माहिती व विश्वासानुसार वर दिलेली माहिती सत्य व खरी आहे आणि मी/आम्ही, माझ्या/आमच्या कंपाउंडिंगच्या प्रकरणाबाबत कंपाउंडिंग प्राधिकरणाने दिलेला कोणताही निदेश/आदेशाचा आम्ही स्वीकार करु.

दिनांकः (अर्जदाराची सही)

नाव

**परिशिष्ट**

**महापरिपत्रकात फेमा १९९९ खाली उल्लंघनाचा कंपाउंडिंगची नियम/ए.पी. (डीआयआर मालिका)ची परिपत्रकात एकत्रित केलेली यादी**

| **नियम अनु क्र.** | **नियम क्र.** | **दिनांक** |
|---|---|---|
| १ | विदेशी विनियम (कंपाउंडिंग कार्यवाही) नियम २००० | मे ३, २००० |
| २ | विदेशी विनियम (कंपाउंडिंग कार्यवाही) नियम २००२ (दुरुस्ती) | नोव्हेंबर २, २००२ |
| ३ | विदेशी विनियम (कंपाउंडिंग कार्यवाही) नियम २००४ (दुरुस्ती) | सप्टेंबर १३, २००४ |
| ४ | विदेशी विनियम (कंपाउंडिंग कार्यवाही) नियम २००४ (दुरुस्ती) | ऑगस्ट २७, २००८ |

ए.पी.(डीआयआर मालिका)परिपत्रक क्र. ५६ दिनांक जुन २८, २०१०.